यशवंत धाराशिव जिल्हा
रविवार दि. २८ एप्रिल २०२४
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com



## फकीरा ब्रिगेडचा अर्चनाताई पाटील यांना पाठिंबा

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – फकीरा ब्रिगेड संघटनेच्यावतीने महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांना पाठिंबा दिला आहे.
भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत पाठिंबा दिला आहे. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रा. राजेंद्र लोदगेकर, प्रदेशाध्यक्ष श्रीरंग सरवदे, लातूर जिल्हाध्यक्ष संजय बिरूळे, धाराशिव जिल्हाध्यक्ष लक्ष्मण खंडाळे, अंकूश कांबळे, नागिनी थोरात आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# हुकुमशाही मोदी सरकारला मतदारांनीच रोखावे – कांबळे

## खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना निवडून आणावे

## ग्रामीण भागाला भकास करण्याचे भाजपाचे धोरण

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – केंद्रातील मोदी सरकार हे हुकूमशाही पद्धतीचा अवलंब करीत आहे. तर शहरी भागातील रस्ते मोठमोठे उड्डाण पूल बांधण्याचे काम उद्योजकांना कामे देऊन त्यांच्याकडून पक्ष निधी घेत आहे. मात्र विकास करण्याच्या नावाखाली ग्रामीण भागाला विकास करण्याचे धोरण आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी मतदान करताना सतर्कता बाळगून हुकुमशही सत्ता उलथवून भाजपला सत्तेतून पायउतार करावे असे आवाहन माजी खासदार शिवाजी कांबळे यांनी दि.२७ एप्रिल रोजी केले. दरम्यान, महाविकास आघाडीचे उमेदवार खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

धाराशिव शहरातील पवनराजे कॉम्प्लेक्स येथे महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी शिवाजी सरडे, रवि कोरे, ॲड संजय भोरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना माजी खासदार कांबळे म्हणाले की, भाजपने अच्छे दिनची व्याख्या तरी सांगावी केवळ भूलथापा मारायच्या व अबकी बार चार सौ पार जागा मिळतील या भ्रमात रहायचे असे उद्योग भाजपने सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे भाजपने गुन्हेगारी कायद्यामध्ये प्रचंड बदल केले असून एखाद्यावर एफ आय आर दाखल झाला तर कमीत कमी तीन महिने त्याला जेलमध्ये टाकण्याची तरतूद केली असल्यामुळे या सरकारची राजकीय हुकूमशाहीकडे वाटचाल असल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या मालाला भाव देण्याचे भाजपचे धोरण नसून ते शेतकरी विरोधी आहे. त्यांना शेतकरी कधीही बलवान होऊ द्यायचा नाही.

लोकसभेचे इलेक्शन संपले की अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला व शिंदे यांच्या शिवसेनेला हाकलून देत भाजप विधानसभेच्या २८८ जागा भाजप लढणार असून या दोन्ही पक्षाला हाकलून देणार असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी दिला. विशेष म्हणजे डॉ पद्मसिंह पाटील यांनी मला खासदारकीला मदत करावी यासाठी मी त्यांच्या घरी गेलो होतो. त्यावेळी त्यांचे वडील बाजीराव व आई जिजाऊ विजयी भव असा आशिर्वाद दिला असल्याचे माजी खासदार कांबळे यांनी सांगितले.

त्यामुळे केंद्र व राज्यातील सरकारला जनतेला मतदान मागण्याचा अधिकार नसल्याचे त्यांनी सांगितले. एकीकडे काँग्रेसची बँक खाती गोठवून टाकून काँग्रेसला धुळे पांगळे केले आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी व शिवसेना फोडली असून अशाच पद्धतीचे पक्ष फोडाफोडीचे राजकारण करून प्रबळ विरोधी पक्ष ठेवला नसल्याचा आरोप करीत मतदारांनी सतर्कता बाळगली तर लोकशाही वाचणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहरी मतदारांना खूश करून उद्योगपतींना कामे देऊन त्यांच्याकडून पैसे



मिळवून इलेक्ट्रॉल बॉण्डच्या माध्यमातून पैसे घ्यायचा हा दुसरा मनी लॉन्ड्रींग असून यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल केलेले आहेत. मात्र त्यावर कुठल्याही प्रकारची सुनावणी नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामीण भागातील सुविधेकडे अजिबात लक्ष नसल्याचे सांगत हे सरकार पुन्हा सत्तेवर न येण्यासाठी मतदारांनी खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले.

# खा. राजेनिंबाळकर यांना युवा भीम सेनेचा जाहीर पाठिंबा – काटकर

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देश एक संघ रहावा यासाठी भारताला संविधान अर्पण केले. मात्र भाजपा संविधानाची पायमल्ली करण्याचे काम करीत असून ते वाचविण्यासह व लोकशाही टिकविण्यासाठी युवा भीम सेनेच्यावतीने महाविकास आघाडीचे उमेदवार खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना बिनशर्त पाठिंबा देत असल्याची माहिती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष पंकज काटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दि.२६ एप्रिल रोजी दिली.



धाराशिव शहरातील पवनराजे कॉम्प्लेक्स येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष महादेव भोसले, संस्थापक सचिव राहुल लांडगे, संपर्क प्रमुख पंकज गायकवाड आदी उपस्थित होते. पुढे बोलताना काटे म्हणाले की, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेले संविधान एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य व सर्वांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक स्वातंत्र्य बहाल करणारे आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती, उपासना, श्रद्धा, विश्वास यांचा मूलभूत अधिकार मिळालेला आहे. एवढे व्यापक असे संविधान असताना भाजपा ही घटना बदलून चातुर्वर्ण व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच २०२४ लोकसभा निवडणूकांमध्ये ईव्हीएम मशीनद्वारे बहुमत घेऊन भारतात अध्यक्षीय लोकशाही आणून घटनेला धक्का लावण्याचा डाव भाजपाने आखला आहे. तसेच २०२४ ची लोकसभा निवडणूक त्यादृष्टीने महत्वाचे असून चारशे पारचा नारा देऊन पाशवी बहुमत प्राप्त करून ते आपला अजेंडा राबविणार आहेत. त्यासाठी जाती–जाती मध्ये, धर्मा–धर्मामध्ये भांडणे लावून देशामध्ये अराजकता निर्माण करू पाहत आहेत. तसेच सध्या देशामध्ये बेरोजगारी, महागाई खूप वाढली असल्यामुळे देश अस्थिर होण्याच्या दिशेने जात आहे. त्यामुळे हे सर्व रोखण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार खा. राजेनिंबाळकर यांना पाठिंबा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

# खा. ओम राजेनिंबाळकर यांनी घेतल्या कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी



परंडा दि.२७ (प्रतिनिधी) – महाविकास आघाडीचे उमेदवार खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर हे परंडा दौऱ्यावर आल्या असता त्यांनी हजरत ख्वॉजा बद्रोद्दीन चिश्ती शहीद रहे. अलैह दर्गा येथे दर्शन घेतले. त्यानंतर श्रीराम मंदीर येथे दर्शन घेऊन आरती केली. तसेच शिवसेना शहर शाखा येथे सदिच्छा भेट दिली. त्यांतर माजी नगरध्यक्ष सुभाष शिंदे व लतीफ कुरैशी भेट दिली. तसेच माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांच्या भेटीगाटी घेतल्या.

यावेळी मा.आ ज्ञानेश्वर पाटील, जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेसचे सरचिटणीस प्रतापसिंह पाटील, तालुकाप्रमुख मेघराज पाटील, शहरप्रमुख रईस मुजावर, माजी नगरध्यक्ष सुभाष शिंदे, माजी नगरध्यक्ष शिवाजी मेहेर, जनार्धन मेहेर , माजी उपनगरध्यक्ष इस्माईल कुरैशी, माजी नगरसेवक मैनूद्दीन तुटके, डॉ. अब्बास मुजावर, इरफान शेख, मन्नान बासले, अनिल शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयकुमार जैन, संचालक जावेद बागवान, अनिकेत काशीद , युवा सेना तालुका प्रमुख शिवाजी देवकर, मधुकर गायकवाड, संतोष गायकवाड, तुकाराम गायकवाड, प्रशांत गायकवाड, बालाजी गायकवाड, राहूल देवळे, राष्ट्रवादीचे राहूल बनसोडे, श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, नसीर शहाबर्फीवाले, जावेद्दीन वस्ताद, खय्युम तुटके, रफिक मुजावर, एजाज मुजावर, शाहरूख मुजावर, फिरोज मुजावर, सदाम मुजावर, शादाब मुजावर, साबेर मुजावर, अझर शेख, मजहर दहेलूज, बुद्दीवान लटके, प्रितम डाके, सत्तार पठाण, लतीफ कुरेशी, सत्तार पठाण मसालेवाले, अभय पाटील, मोहसीन कुरैशी, सुफीयान कुरैशी, राजा पाटील, गजेंद्र गायकवाड, बुद्धीवान गोडगे, राजभाऊ कुमार, अशोक गवारे, जिशान काझी, कुणाल जाधव, डिपक पाटील, गनी हावरे, शिवाजी गायकवाड, कासीम तुटके, बाबा गायकवाड, जोएब हावरे, तय्यब मुजावर, संतोष मेहेर, सोमनाथ अलबते, रविकिरण चैतन्य, मुत्तलिब कुरैशी, इरशाद कुरैशी, बालाजी बुलबुले, सुरेश सुतार, शरद डोरले आदी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय संविधान ग्रंथाचे अवलोकन करून न्याय व्यवस्थेला गती द्यावी – न्यायमूर्ती वराळे

## भारतीय संविधान पालखी ठरली सोहळ्याचे विशेष आकर्षण



धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – भारतीय संस्कृतीत विविध जाती,धर्माचे पवित्र ग्रंथ आहे,त्याचा स्वाभिमान जपला पाहिजे.परंतु न्याय मंदिरात पवित्र अशा भारतीय संविधान ग्रंथाचे अवलोकन करुन त्या पद्धतीने काम केल्यास मिळणारे आत्मिक समाधान विशेष असे असते. तरुण वकिल मंडळींनी इतिहासाविषयी सजग असले पाहिजे. कायद्याच्या पुस्तकाबरोबरच विविध पुस्तकांचे मित्र होऊन सामाजिक दृष्टिकोन जागृत ठेवावा, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती प्रसन्न वराळे यांनी दि.२७ एप्रिल रोजी केले.

उमरगा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन न्यायमुर्ती वराळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे न्या.अरूण पेडणेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र घुगे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी.के. अनभुले,महाराष्ट्र व गोवा बार असोशिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मिलींद पाटील, उमरगा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. जी.के. गायकवाड यांची उपस्थित होते.

न्यायमुर्ती वराळे म्हणाले की, व्हॉटस ॲपच्या माध्यमातून मिळणारे ज्ञान समजण्याचा भ्रम झाला आहे. मात्र माहिती आणि ज्ञान यात फरक आहे. ज्ञान संपादन करावे लागते. न्यायालयाची वास्तु सुंदर झाली आहे. परंतू वास्तुतील जडत्व जाऊन चैतन्याचा प्रवेश झाला पाहिजे. न्याय मंदिरात पक्षकार मोठ्या अपेक्षेने येतात. त्यांच्यासाठी न्याय दानाची प्रक्रिया व्हावी. प्रत्येक व्यक्ति पर्यावरण स्नेही असले पाहिजे, असे संदेश या कार्यक्रमात वृक्ष भेट देऊन करण्यात आला. महान महापुरुष, जेष्ठ विधीज्ञ यांच्या पुस्तकाचे वाचन आणि आदर्श घेऊन विधीज्ञ मंडळींनी काम करावे असे सांगून या इमारतीच्या उभारणीसाठी अथक प्रयत्न करणाऱ्या विविध यंत्रणेचे व व्यक्तीचे न्या.वराळे यांनी कौतुक केले. यावेळी न्या. पेडणेकर, न्या.घुगे, ॲड. मिलींद पाटील यांची भाषणे झाली. या कार्यक्रमास आमदार ज्ञानराज चौगुले, माजी खासदार प्रा.रविंद्र गायकवाड, प्रा.सुरेश बिराजदार, डॉ.चंद्रकांत महाजन, जितेंद्र शिंदे, कंत्राटदार विक्रम गायकवाड, सुनील पाटील, माजी नगराध्यक्ष रज्ञाक अत्तार, सिद्रामप्पा चिंचोळे, किरण गायकवाड, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसिलदार गोविंद येरमे, गट विकास अधिकारी प्रतापसिंह मरोड, विधीज्ञ मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. अक्षय तोतला, सचिव ॲड. प्रवीण पाटील, सहसचिव ॲड. वर्षा जाधव, कोषाध्यक्ष ॲड. दादाराव कातपुरे, ॲड. एम.डी. गायकवाड, ॲड. व्ही.एस.आळंगे, ॲड. संदिप देशपांडे, ॲड. प्रविण तोतला, ॲड.एस.पी. इनामदार, ॲड. अमित सांगवे, ॲड.शिल्पा सुरवसे आदी उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शेंडे यांनी स्वागतपर भाषण केले. प्रास्ताविक उमरगा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड जी.के. गायकवाड यांनी तर सूत्रसंचालन संजय मैंदर्गी यांनी व उपस्थितांचे आभार जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्या.डी.के. अनभुले यांनी आभार मानले.

### डॉ. आंबेडकर यांच्यामुळे सर्वोच्च पदापर्यंत पोहचलो

विषमतेचे साखळदंड तोडून समानतेचा मंत्र देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे सर्वोच्च पदापर्यंत पोहचलो अशी भावना न्यायमुर्ती वराळे यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी छत्रपती शिवराय, संत तुकाराम, संत नामदेव, संत रामदास यांच्या सामाजिक कर्तृत्वाची महती सांगितली. त्यांचा आदर्श सामाजिक परिवर्तनासाठी महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

### भारतीय संविधानाचा दिमाखदार पालखी सोहळा

जिल्हा न्यायालयाची देखणी इमारत उमरगा शहराच्या वैभवात भर टाकणारी आहे. यावेळी येथील विधीज्ञ मंडळाच्या सदस्यांनी नुतन इमारतीतून विचारपीठापर्यंत टाळ मृदंगाच्या निनादात, वारकऱ्यांच्या वेशभुषेत भारतीय संविधानाचा लक्षवेधक पालखी सोहळा काढण्यात आला. हे दृश्य पाहून न्यायमुर्ती वराळे यांनी सोहळ्यात सहभागी होऊन पालखीला खांदा दिला.

# मंत्री सावंत वडिलांवर बोलाल तर याद राखा – खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.२७ (प्रतिनिधी) – तुमच्या वयाचा मान ठेवतो म्हणून तुमच्यावर आम्ही काही बोलत नाहीत. परंतू त्याचा तुम्ही चुकिचा अर्थ काढत आमच्यावर काहीही बोलत बसू नका. जर यापुढे तुम्ही माझ्या वडीलावर टिका करीत असाल तर ती अजिबात खपवून घेणार नसल्याचा थेट इशाराच खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी पालकमंत्री प्रा. डॉ तानाजीराव सावंत यांना उपळा येथील आयोजित प्रचार सभेत दिला.

पालकमंत्री प्रा.तानाजीराव सावंत यानी धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील मेळाव्यात खा राजेनिंबाळकर, आ कैलास पाटील यांच्यासह त्यांच्या वडीलावर गंभीर आरोप करीत टिका केली होती. आयोजीत केला होता. मात्र प्रा.सावंत यानी स्वर्गीय पवनराजे यांच्यावरही विनाकारक टिका केल्यामुळे खा. राजेनिंबाळकर यानी त्यांना थेट प्रत्युत्तर दिले आहे. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, आम्ही तुमच्यासोबत गद्दारी केली नाही म्हणून तुमचा राग आमच्यावर असल्याचा पलटवार त्यांनी केला. या अगोदरही ही खदखद तुम्ही अनेकवेळा बोलुन दाखविली आहे. आता तुम्ही बोलण्याची मर्यादा ओलांडली आहे, तुमची पात्रता नसताना पवनराजे यांच्यावर बोलण्याचे धाडस केले आहे. हे मी कदापी सहन करणार नसल्याचे खा राजेनिंबाळकर यानी सावंताना ठणकावले आहे. विशेष म्हणजे एवढे शिक्षण गोल्ड मेडलिस्ट, पीएचडी धारक असल्यानंतरही तुमच्या बोलण्याची पध्दत



अत्यंत खालच्या पातळीवर असल्याचे आश्चर्य आहे. यावरुन तुमच्यावर संस्कार करण्यात तुमचे मातापिता कमी पडले का ? अशी शंका येते. तसेच तुमचे वय पाहून आतापर्यंत तुम्हाला आम्ही काहीही बोललो नाही याचा अर्थ आम्हाला बोलता येत नाही असे गृहित धरु नये असा इशारा प्रा.सावंत यांना दिला आहे. जर यापुढे पवनराजे यांच्याबद्दल ब्र शब्द देखील आपण काढला तर मी सहन करणार नसल्याचा सूचक इशारा वजा दम त्यांनी प्रा सावंत यांना दिला आहे.

